# वारी नारीशक्तीची उपक्रमाची पंतप्रधान मोदींकडून दखल

## राज्य महिला आयोग अध्यक्षा रहाटकर यांची संकल्पना



**नवी दिल्ली , पुढारी वृत्तसेवा** : महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांची संकल्पना असलेल्या वारी नारीशक्तीची या उपक्रमाची दखल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतली आहे. आयोगातर्फे आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर या उपक्रमाची सुरुवात केली आहे.

या उपक्रमांतर्गत आषाढी वारीत सहभागी होणाऱ्या महिलांना आरोग्य कसे जपावे, याविषयी मार्गदर्शन केले जात आहे. अभिनेता अक्षय कुमार या उपक्रमाला मदत करीत आहेत. डॉक्टरांचे पथक मार्गदर्शन करत आहे. विशेष चित्ररथाद्वारे सॅनिटरी नॅपकीन वापरण्याचे फायदे दाखविले जात आहेत. चित्ररथावर महिला सशक्तीकरणाचे संदेश देणारे चित्रपट व लघुपट दाखविले जात आहेत.

रहाटकर यांनी उपक्रमाची माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दिली. भाजप महिला मोर्चाच्या राष्ट्रीय अध्यक्ष असलेल्या विजया रहाटकर यांनी भाजप महिला मोर्चाच्या कार्याचा अहवाल पंतप्रधान मोदी यांना सादर केला. निवडणूक काळात रहाटकर यांचा २७ हजार कि.मी.चा प्रवास केला, असे त्यांनी अहवालात म्हटले आहे.